महाराष्ट्र शासन
वस्तू व सेवाकर विभाग
विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय, ३ रा मजला, माझगांव,
मुंबई ४०० ०१०. दूरध्वनी क्र. ०२२ २३७६०८६५
ई-मेल आय डी - acest6@gmail.com

कर भरा, राष्ट्र घडवा.

---

**क्रमांक:** रा.सहा.आ./आस्था.-६/जुनी निवृत्तीवेतन योजना/२०२६/ब- 38 मुंबई दि. 17/03/2026

## कार्यालयीन ज्ञापन

**विषय :** दि. ०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहीरात/अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करणेबाबत. गट ड संवर्गात नियुक्ती झालेले १२ कर्मचारी.

**संदर्भ :** शासन निर्णय क्र. संकिर्ण -२०२३/प्र.क्र.४६/सेवा-४, मंत्रालय, मुंबई -४०००३२ दि.०२.०२.२०२४.

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयाअन्वये दि.०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहीरात/अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतूदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय (One Time Option) देण्यात आला आहे. जुनी निवृत्तीवेतन योजना व अनुषंगिक नियम लागू करण्याचा प्रस्ताव संबंधित राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासननिर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत देणे बंधनकारक आहे.

२. केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्तीवेतन योजना व अनुषंगिक नियमाच्या तरतूदी लागू करण्याचे संबंधित १२ कर्मचाऱ्यांचे अर्ज/प्रस्ताव आस्थापना अधिकारी (आस्था.) ११, विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय, मुंबई, आस्थापना अधिकारी, नोडल १ व २, मुंबई, आस्थापना अधिकारी, भाईंदर, आस्थापना अधिकारी, नांदेड, आस्थापना अधिकारी (व्यवसायकर), मुंबई, आस्थापना अधिकारी, मोठे करदाते कक्ष, मुंबई तसेच आस्थापना अधिकारी, सीमा तपासणी नाके, नोडल ११, मुंबई यांचेकडून या कार्यालयास प्राप्त झाले.

३. त्यानुसार, संदर्भाधिन शासन निर्णयातील तरतूदीनुसार, तत्कालिन आस्थापना अधिकारी, विक्रीकर उपआयुक्त (प्रशासन), वरळी विभाग, मुंबई या कार्यालयाकडून दि.३०.०६.२००३, ०१.०७.२००३, ०३.०७.२००३

व ०४.०७.२००३ रोजीच्या पत्रांन्वये वर्ग ४ च्या पदभरती करिता मुलाखतीस बोलावल्याच्या (call letters) अनुषंगाने गट- ड संवर्गात नियुक्त झालेल्या खालील १२ कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण), १९९४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतूदी लागू करण्याबाबत विनंती केली आहे -

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम | कार्यरत असलेले कार्यालय | पदभरती मुलाखतीस बोलाविल्याच्या पत्राचा दिनांक | नियुक्ती आदेश दिनांक/नियुक्तीचा दिनांक | एक वेळ पर्याय अर्ज दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. सागर सुभाष चव्हाण, राज्यकर निरीक्षक | विशेष राज्यकर आयुक्त, म. राज्य, मुंबई | ३०.०६.२००३ | ०७.०८.२००७ | ०६.०२.२०२४ |
| २. | श्री. भरत रामचंद्र कोळी, शिपाई | विशेष राज्यकर आयुक्त, म. राज्य, मुंबई | ३०.०६.२००३ | ०७.०८.२००७ | ०६.०२.२०२४ |
| ३. | श्री. मंगेश वैजनाथ वसईकर, शिपाई | राज्यकर सहआयुक्त, नोडल १ व २, मुंबई | ०१.०७.२००३ | ०७.०८.२००७ | निरंक/या कार्यालयास प्राप्त दि. १२.०२.२०२४ |
| ४. | श्री. अरुण सुरेश गायकवाड, कर सहायक | विशेष राज्यकर आयुक्त, म. राज्य, मुंबई | ३०.०६.२००३ | ०७.०८.२००७ | ०९.०२.२०२४ |
| ५. | श्री. सुरेश रामचंद्र कोळी, शिपाई | राज्यकर सहआयुक्त (प्रशा.), भाईंदर | ३०.०६.२००३ | ०७.०८.२००७ | ०५.०२.२०२४ |
| ६. | श्री. संजय बाळकृष्ण कोळी, शिपाई | अपर राज्यकर आयुक्त, मुंबई ०४, मुंबई | ३०.०६.२००३ | ०७.०८.२००७ | ०६.०२.२०२४ |
| ७. | श्री. प्रकाश कोंडीबा शिंदे, शिपाई | अपर राज्यकर आयुक्त, मुंबई ०४, मुंबई. | ३०.०६.२००३ | ०७.०८.२००७ | ०६.०२.२०२४ |
| ८. | श्री. उल्हास गोविंद जाधव, शिपाई | राज्यकर सहआयुक्त (प्रशा.) नांदेड | ०३.०७.२००३ | ०७.०८.२००७ | ०६.०२.२०२४ |
| ९. | श्री. शंकर विष्णू झिमल, चपराशी | राज्यकर सहआयुक्त, | ३०.०६.२००३ | ०७.०८.२००७ | १३.०२.२०२४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | नोडल विभाग ११, मुंबई | | | |
| **१०.** | श्रीम. सरिता बाळकृष्ण राऊत/सरिता निलेश नाखवा, शिपाई | राज्यकर सहआयुक्त (व्यवसायकर), मुंबई | ३०.०६.२००३ | ०७.०८.२००७ | ०६.०२.२०२४ |
| **११.** | श्री. निलेश बाळकृष्ण नाखवा, शिपाई | राज्यकर सहआयुक्त, नोडल विभाग ११, मुंबई | ०१.०७.२००३ | ०९.०८.२००७ | निरंक/या कार्यालयास प्राप्त दि. ०४.०४.२०२४ |
| **१२.** | श्री. संतोष धोंडू गुरव, राज्यकर निरीक्षक | राज्यकर सहआयुक्त (व्यवसायकर), मुंबई | ०४.०७.२००३ | ०७.०८.२००७ | २२.०५.२०२४ |

४. उपरोक्त तक्त्यात नमूद अ.क्र. १ ते १२ कर्मचाऱ्यांच्या जुनी निवृत्तीवेतन योजना मिळण्याबाबतच्या अर्ज/प्रस्तावांसोबत, तत्कालिन विक्रीकर उपआयुक्त (प्रशासन), वरळी विभाग, मुंबई यांच्या कार्यालयाचे पत्र दि.०१.०८.२००३ द्वारे तयार करण्यात आलेली निवडसूची प्राप्त झालेली नाही. वस्तू व सेवाकर विभागाच्या सन २००७ मध्ये झालेल्या पुनर्रचनेत तत्कालिन विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे सुधारित आदेश दि.०७.०७.२००७ मध्ये विक्रीकर विभागाच्या पुनर्रचनेनंतर कार्यालयनिहाय पदांचे सुधारित वितरण व पदनामात सुधारणा व त्या अनुषंगाने आहरण व संवितरण अधिकारी निहाय पदवाटप मंजूरीचे तक्ते यातील तक्ता क्र. २ मध्ये अपर विक्रीकर आयुक्त (मुंबई विक्रीकर कायदा) यांच्या कार्यालयाचा आराखडा आहे. त्यानुसार, तत्कालिन विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन) वरळी हा विभाग अपर विक्रीकर आयुक्त (मुंबई विक्रीकर कायदा) मध्ये विलीन झाला, त्यांचेकडे सदर विभागाचे प्रशासनिक व कार्यकारी नियंत्रण देण्यात आले. सबब, प्रस्ताव प्राप्त कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी, दि. ०१.०८.२००३ च्या पत्राद्वारे तयार करण्यात आलेली निवडसूची पाठविण्याबाबत या कार्यालयाच्या दि. २९.०५.२०२५ च्या पत्रान्वये राज्यकर सहआयुक्त, मुंबई विक्रीकर कायदा, मुंबई यांना कळविण्यात आले. त्यांचे कार्यालयाकडून दि.१५.०७.२०२५ च्या पत्रान्वये अहवाल प्राप्त झाला. त्याअन्वये पुढीलप्रमाणे कळविले - तत्कालिन विक्रीकर उपआयुक्त (प्रशासन) वरळी यांच्या कार्यालायाच्या दि.०१.०८.२००३ च्या पत्राद्वारे तयार करण्यात आलेली निवडसूची त्यांचे कार्यालयास हस्तांतरित केल्याचे अभिलेख उपलब्ध नाहीत. तसेच दि. १२.०७.२००७ रोजीचे वर्ग ४ पदी नियुक्तीचे आदेश हे तत्कालिन अपर विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या स्वाक्षरीने पारित करण्यात आले आहेत व सदर आदेशातील संदर्भ क्र. ४ मध्ये तत्कालिन विक्रीकर उपआयुक्त (प्रशा.), वरळी यांच्या दि. ०१.०८.२००३ च्या पत्राचा व तयार

करण्यात आलेल्या निवडसूचीचा स्पष्ट उल्लेख दिसून येतो. असेही कळविले आहे. **सदर दि.१२.०७.२००७ च्या आदेशात उपरोक्त तक्त्यात नमूद अ.क्र. १ ते १२ कर्मचाऱ्यांची नावे अंतर्भूत आहेत.**

**५.** सन २००७ साली विक्रीकर विभागाच्या झालेल्या पुनर्रचनेस अनुसरुन, दि. ०७.०७.२००७ रोजीच्या सुधारित आदेश व कार्यवाटप तक्त्यानुसार, मुंबई क्षेत्रातील गट - ड संवर्गातील आस्थापना विषयक बाबी पुनर्रचनेपूर्वी तत्कालिन विक्रीकर उपआयुक्त (प्रशा.) वरळी व आस्थापना ३ या कार्यालयांकडे होत्या. पुनर्रचनेनंतर त्या आस्थापना - ६ कडे सोपविण्यात आल्या. सबब, दि.०१.०८.२००३ च्या पत्राद्वारे तयार करण्यात आलेली निवडसूची पाठविण्याबाबत या कार्यालयाच्या दि.०६.०८.२०२५ च्या अनौपचारिक संदर्भान्वये राज्यकर उपआयुक्त (आस्थापना) ३ यांचे कार्यालयास कळविण्यात आले. त्यास अनुसरुन, त्याबाबतचा कोणताही अभिलेख त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही, असे राज्यकर उपआयुक्त (आस्थापना) ३ यांच्या दि. २१.०८.२०२५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. तसेच आस्थापना -६ या कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडूनही दि. २६.१२.२०२५ रोजी अभिलेख कक्षात शोध घेण्यात आला असता, निवडसूची आढळून आली नाही. अशाप्रकारे निवडसूची मिळविण्याकरिता सर्वतोपरि प्रयत्न करण्यात आले.

**६.** तत्कालिन विक्रीकर उपआयुक्त (प्रशासन), वरळी विभाग, मुंबई यांच्या कार्यालयाचे पत्र दि.०१.०८.२००३ द्वारे तयार करण्यात आलेली निवडसूची प्राप्त झाली नाही. करिता, **मुलाखतीसाठी हजर राहण्याबाबत तत्कालिन विक्रीकर उपआयुक्त (प्रशा.) वरळी कार्यालयाने कर्मचाऱ्यांस पाठविलेले पत्र ग्राह्य धरण्यात येत आहे. कारण सदरचे पत्र हे सन २००३ मध्ये निर्गमित केलेले म्हणजे दि. ०१.११.२००५ पूर्वीचे आहे.**

**७.** वरील तक्त्यातील अ.क्र. ५ ते ७ व ९ ते १२ या उमेदवारांच्या बाबतीत आवश्यक कागदपत्र म्हणजे **'कर्मचाऱ्याचा रूजू अहवाल'** याची प्रमाणित प्रत प्राप्त झाली नाही. या ऐवजी संबंधित कार्यालयांकडून तत्कालिन विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन) वरळी विभाग, मुंबई यांचे **आदेश क्र. ब-२३८, मुंबई दि. ०७.०८.२००७ नुसार** अ.क्र. ५ ते ७ व ९, १० व १२ मध्ये नमूद उमेदवारांची अनुक्रमे **दि.०४.०८.२००७, ०४.०८.२००७, ०३.०८.२००७, ०३.०८.२००७, ०३.०८.२००७, ०६.०८.२००७** रोजी नियुक्ती करण्यात आली अशी नोंद सेवापुस्तकात घेतल्याच्या पृष्ठाची प्रमाणित प्रत सादर केली आहे. तसेच सदर दि.०७.०८.२००७ रोजीच्या आदेशाची प्रमाणित प्रत आस्थापना अधिकारी (आस्था.११), विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्या दि.१०.१०.२०२५ च्या पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाली आहे. तसेच तत्कालिन विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन) वरळी विभाग, मुंबई यांचे **आदेश क्र.ब २४१४ मुंबई दि.०९.०८.२००७** नुसार अ.क्र. ११ मध्ये नमूद उमेदवाराची **दि.०८.०८.२००७ रोजी नियुक्ती** करण्यात आली अशी नोंद सेवापुस्तकात घेतल्याच्या पृष्ठाची प्रमाणित प्रत सादर

केली आहे. तसेच सदर दि.०९.०८.२००७ रोजीच्या आदेशाची प्रमाणित प्रतही सादर केली आहे. अशाप्रकारे सात कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या रूजू अहवालाऐवजी त्यांची नियुक्ती करण्यात आली याबाबत सेवापुस्तकातील संबंधित नोंदीच्या पृष्ठाची प्रत ग्राह्य धरण्यात येत आहे.

८. उपरोक्त तक्त्यात नमूद अ.क्र. १ ते १२ कर्मचाऱ्यांनी - जुनी निवृत्तीवेतन योजना व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय विहित मुदतीत सादर केला आहे. त्यांना पदभरती मुलाखतीस बोलाविल्याची पत्रे ही दि.०१.११.२००५ पूर्वीची आहेत. तसेच नियुक्ती आदेशानुसार त्यांची नियुक्ती ही दि. ०१.११.२००५ नंतरची आहे. यास्तव, शासन निर्णय, वित्त विभाग दि. ०२.०२.२०२४ मधील तरतूदीनुसार उक्त तक्त्यातील अ.क्र. १ ते १२ कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण), १९९४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतूदी लागू करण्यात येत आहेत.

९. सबब, संदर्भाधिन क्र. १ च्या दि. ०२.०२.२०२४ च्या शासननिर्णयास अनुसरुन, उपरोक्त नमूद अ.क्र. १ ते १२ कर्मचाऱ्यांच्या विकल्प/विनंती अर्जानुसार संबंधित कार्यालय प्रमुख/आस्थापना अधिकारी यांनी - सदर कर्मचाऱ्यांना पदभरती मुलाखतीस बोलाविल्याची पत्रे (call letters), त्यांचे नियुक्ती आदेश व रुजू झाल्याचा दिनांक यांची आपल्या कार्यालयीन स्तरावर व्यवस्थित तपासणी करुन (मूळ मुलाखतीस बोलाविल्याचे पत्र, मूळ नियुक्ती आदेश यांच्या मूळ प्रती तपासून व त्याच्या प्रमाणित प्रती अभिलेखावर ठेऊन) (तसेच कार्यालयात रुजू झाल्याबाबत, उपरोक्त परिच्छेद क्र. ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पाच कर्मचाऱ्यांचा मूळ रुजू अहवाल व ज्या सात कर्मचाऱ्यांचा रुजू अहवाल प्राप्त झालेला नाही त्यांच्या बाबतीत सेवापुस्तकातील संबंधित नोंद यांच्या मूळ प्रती तपासून व त्याच्या प्रमाणित प्रती अभिलेखावर ठेऊन) सदर संबंधित कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण), १९९४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक तरतूदी लागू करण्याची कार्यवाही पूर्ण करावी.

१०. उक्त अ.क्र. ३ मधील तक्त्यात नमूद कर्मचाऱ्यांना, वरील अनुक्रमांक ९ नुसारची कार्यवाही पूर्ण केल्यानंतर, शासन निर्णय, वित्त विभाग दि. ०२.०२.२०२४ नुसार, जुनी निवृत्ती वेतन योजना व अनुषंगिक तरतूदी लागू करण्यात येत असल्यामुळे त्यांचे राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) मधील खाते आहरण व संवितरण अधिकारी यांनी तात्काळ बंद करावे. तसेच भविष्य निर्वाह निधीचे (GPF) खाते उघडण्यात यावे व सदर खात्यात राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) च्या खात्यातील त्यांच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह जमा करण्यात यावी. तसेच राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) च्या खात्यातील राज्य शासनाच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह राज्याच्या एकत्रित निधीत वळती करण्यात यावी.

११. संदर्भाधिन शासन निर्णयाच्या अधिन राहून प्रस्तुत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत. भविष्यात सदर शासन निर्णयातील तरतूदींशी विसंगत बाब आढळून आल्यास, संबंधित कर्मचाऱ्याच्या बाबतीत प्रस्तुत आदेश रद्द समजण्यात येतील.

17/3/26

**नितीन पाटील (भा.प्र.से.)**
**विशेष राज्यकर आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रत -**

१) कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यकर आयुक्त, वस्तू व सेवाकर विभाग, महाराष्ट्र राज्य.
३) राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय-०४), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) व (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई/नागपूर/ठाणे.
५) संबंधित अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) सर्व संबंधित राज्यकर सहआयुक्त.
७) सर्व संबंधित कर्मचारी (संबंधित कार्यालयामार्फत).
८) स्थळप्रत.